


Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB OF AMBAJOGAI CITY
25
SILVER JUBILEE
2001-2025

# रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी

# सहयोग

फेब्रुवारी-2026



लहान हृदयांना नवी धडधड
रोटरीने दिला जीवनाचा नवा श्वास

## कार्य अहवाल

०१ जानेवारी २०२५ - ३० जानेवारी २०२५

**रो.रोहिणी पाठक**
अध्यक्ष २०२५-२६

**रो.मंजुषा जोशी**
सचिव २०२५-२६

सहयोग संपादक / डायरेक्टर पब्लिक इमेज

रो.अविनाश मुडेगांवकर

Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | तारीख | उपक्रमाचे नांव | पा.क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | ०१/०२/२०२६ | भव्य मोफत बाल हृदय रोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर | |
| ०२. | ०५/०२/२०२६ | आर.सी.सी.अंतर्गत भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबीर | |
| ०३. | ०५/०२/२०२६ | महिला सक्षमीकरण वसंवर्धनासाठी नारळ लागवड उपक्रम. (आर.सी.सी.) | |
| ०४. | ०५/०२/२०२६ | अर्णव इंडस्ट्रिअल व्हिजीट | |
| ०५. | ०६/०२/२०२६ | सेंद्रीय शेती प्रशिक्षण व कृषीकुल भेट. | |
| ०६. | ०८/०२/२०२६ | अंधमुक्त गाव मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर क्र.९ | |
| ०७. | १२/०२/२०२६ | क्लब फुट साहित्य वाटप. | |
| ०८. | १९/०२/२०२६ | शिवजयंती निमित्त सर्वंकष मोफत आरोग्य तपासणी शिबीर-चनई गाव | |
| ०९. | २३/०२/२०२६ | रोटरी क्लब ने पोलिस स्टेशन च्या भिंती केल्या बोलक्या-सार्वजनिक सौंदर्यीकरण | |
| १०. | २३/०२/२०२६ | मुळव्याध तपासणी व आयुर्वेदीक शिबीर | |
| ११. | २३/०२/२०२६ | शीत शवपेटीचे लोकार्पण | |
| १२. | २३/०२/२०२६ | रोटरी डे सेलीब्रेशन | |
| १३. | २८/०२/२०२६ | उत्थान साधना सेमीणार पुणे येथील रोटरी क्लबच्या फ्लॅगचे अनावरण | |
| १४. | २६/०१/२०२६ | उत्थान साधना AGLS, DTLS, RLI सेमीनार, पुणे-को होस्ट रोटरी क्लब अंबाजोगाई सिटी | |
| १५. | /०२/२०२६ | विकली मिटींग......................................................................... | |
| १६. | /०२/२०२६ | फ्लायर्स आणि बातम्या.................................................................. | |
| १७. | /०२/२०२६ | बर्थडे................................................................................ | |






















Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# भव्य मोफत बाल हृदयरोग तपासणी शिबिर

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, घुगे हार्ट अँड क्रिटिकल केअर हॉस्पिटल, आय.एम.ए. महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (महाराष्ट्र शासन) आणि लिटल हार्ट केअर हॉस्पिटल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 1 फेब्रुवारी 2026 रोजी घुगे हार्ट अँड क्रिटिकल केअर हॉस्पिटल, अंबाजोगाई येथे भव्य मोफत बाल हृदयरोग तपासणी शिबिर (Camp No. 2) यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले.या शिबिरासाठी मा अक्षय भैय्या मुंदडा डॉ. संतोष कुलकर्णी (अध्यक्ष, IMA महाराष्ट्र राज्य) आणि श्री. नंदकिशोरजी मुंदडा (नगराध्यक्ष, अंबाजोगाई) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाला विशेष बळ मिळाले.शिबिरात डॉ. पंकज सुगावंकर (वरिष्ठ पेडियाट्रिक कार्डिओलॉजिस्ट) यांनी बाल हृदयरोग तपासणीसाठी विशेष सेवा दिली. तसेच डॉ. नवनाथ घुगे (कार्डियाक स्पेशालिस्ट) यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत होती. यामध्ये डॉ. श्रीनिवास रेड्डी, डॉ. सचिन पोटदार, डॉ. अतुल शिंदे, डॉ. धातंपत्रे, डॉ. राहुल ढाकडे तसेच RBSK टीममधील डॉ. रंगाडे व डॉ. लोमटे यांचा सक्रिय सहभाग होता.शिबिरामध्ये 0 ते 18 वर्षे वयोगटातील 153 बालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी 33 बालकांमध्ये हृदयविकाराचे निदान झाले असून 16 बालकांना मोफत शस्त्रक्रियेसाठी पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली. तसेच अनेक बालकांना पुढील उपचार व फॉलोअपसाठी मार्गदर्शन करण्यात आले.या प्रकल्पाचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणीमध्ये रोटरी अध्यक्षा रो. रोहिणी पाठक यांच्या नेतृत्वाखाली रो. संतोष मोहिते, रो. धनराज सोळंकी, रो. राधेश्याम लोहिया, रो. कल्याण काळे, रो. राजेंद्र घोडके, रो. रुपेश रामावत व इतर रोटरी सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला.हा उपक्रम ग्रामीण व निमशहरी भागातील बालकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला असून, लवकर निदान व उपचाराच्या माध्यमातून अनेक कुटुंबांना आशेचा किरण मिळाला. रोटरीच्या “Service Above Self” या ब्रीदवाक्याला साजेसा हा एक प्रभावी व जीवनदायी प्रकल्प ठरला.












Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# RCC अंतर्गत भव्य आरोग्य तपासणी शिबिर

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व RCC जोगाईवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने, R C C चेअरमन रो. बाळाजी घाडगे यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक 5 फेब्रुवारी 2026 रोजी हनुमान मंदिर परिसर, जोगाईवाडी येथे मोफत सर्वंकष आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.या शिबिराचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब लोमटे (तालुका आरोग्य अधिकारी), डॉ. शहाजी लोमटे, सरपंच यशवंत सेना अध्यक्ष बाळासाहेब दोडतले व रोटरी अध्यक्षा रो. रोहिणी पाठक यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो. धनराज सोळंके यांनी केले तर प्रकल्प प्रमुख रो. राजेंद्र घोडके यांनी आभार मानले. यावेळी रो. राधेश्याम लोहिया, रो. बाळाजी घाडगे, गोरख बापू मुंडे, डॉ. अरुणा केंद्रे, डॉ. प्रिया तिडके, स्वप्निल परदेशी, गणेश राऊत, रो. रुपेश रामावत आदी मान्यवर उपस्थित होते.या शिबिरात दंत, नेत्र, सर्वसाधारण तपासणी, रक्तदाब व साखर तपासणी तसेच महिलांसाठी आरोग्य सल्ला अशा सेवा देण्यात आल्या. एकूण 250+ नागरिकांनी लाभ घेतला. नेत्र तपासणीत 110 ज्येष्ठांची तपासणी, त्यापैकी 16 मोतीबिंदू शस्त्रक्रिया व 15 जणांना चष्मे देण्याचे निश्चित झाले.या उपक्रमासाठी डॉ. अरुणा केंद्रे, डॉ. प्रिया तिडके, डॉ. पूजा घाडगे, डॉ. शहाजी लोमटे, डॉ. गणेश माले, डॉ. प्रमिला शिंदे तसेच आनंद ऋषी नेत्रालय यांच्या टीमचे विशेष सहकार्य लाभले.हा प्रकल्प ग्रामीण भागात आरोग्य सेवा पोहोचवणारा, लवकर निदान व जनजागृती करणारा प्रभावी उपक्रम ठरला असून रोटरी व RCC च्या समाजसेवेचा उत्कृष्ट नमुना ठरला.
























# महिला सक्षमीकरण व पर्यावरण संवर्धनासाठी नारळ लागवड उपक्रम





अंबाजोगाई : रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व R C C जोगाईवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 5 फेब्रुवारी 2026 रोजी अमरधाम स्मशानभूमी परिसरात नारळ लागवड उपक्रम राबविण्यात आला. RCC चेअरमन रो. बाळाजी घाडगे यांच्या पुढाकाराने आयोजित या प्रकल्पांतर्गत एकूण 26 नारळाच्या झाडांची लागवड करण्यात आली.या उपक्रमाचा उद्देश पर्यावरण संवर्धनासोबतच ग्रामीण भागातील महिलांना लघुउद्योगाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविणे हा आहे. भविष्यात या झाडांपासून मिळणाऱ्या उत्पादनांवर आधारित महिलांना प्रशिक्षण व रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.रोटरी अध्यक्षा रो. रोहिणी पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली रोटरी व RCC सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या प्रकल्पामुळे स्मशानभूमी परिसराचे हरितीकरण होऊन महिलांसाठी शाश्वत उत्पन्नाचे साधन निर्माण होणार असल्याचे मत व्यक्त

## अर्णव - इंडस्ट्रियल व्हिजिट






रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी तर्फे Vocational Service व Women Empowerment या अंतर्गत दिनांक 5 फेब्रुवारी 2026 रोजी RCC आरोग्य शिबिरानंतर अर्नव डोअर फॅब्रिकेशन इंडस्ट्री, जोगाईवाडी येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली.या भेटीदरम्यान रोटरी सदस्यांनी SS दरवाजे निर्मिती प्रक्रिया, फॅब्रिकेशन, फिनिशिंग, गुणवत्ता नियंत्रण व व्यवस्थापन प्रणाली यांचा सखोल अभ्यास केला. उद्योगाची शिस्तबद्ध व आधुनिक कार्यपद्धती सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली.या उद्योगाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे हा उद्योग महिला उद्योजिका सौ. रक्षा धनराज सोळंकी यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे चालविला जात असून रो. धनराज सोळंकी (उपाध्यक्ष) यांचे सहकार्य लाभत आहे. केवळ 4 वर्षांत या उद्योगाने उल्लेखनीय प्रगती साधून जिल्ह्याबाहेरही आपली ओळख निर्माण केली आहे.ही भेट केवळ औद्योगिक माहितीपुरती मर्यादित न राहता महिला सक्षमीकरण, आत्मविश्वास व उद्योजकतेचा प्रेरणादायी अनुभव ठरली.






# सेंद्रिय शेती प्रशिक्षण व GVT कृषिकुल एक्सपोजर व्हिजिट – वर्कशॉप 2

रोटरी स्केल ग्रँट अंतर्गत रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व रोटरी क्लब ऑफ दिल्ली प्रीमियर यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच ग्लोबल विकास ट्रस्ट (GVT कृषिकुल) यांच्या सहकार्याने दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी GVT कृषिकुल, सिरसाळा (ता. परळी) येथे ५३ शेतकऱ्यांसाठी (१६ महिला शेतकरी) सेंद्रिय शेती प्रशिक्षण व एक्स्पोजर व्हिजिट यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली.या कार्यशाळेत सेंद्रिय व शाश्वत शेती पद्धती, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, बागायती व्यवस्थापन, माती सुधारणा, कमी खर्चात जास्त उत्पादन यांवर मार्गदर्शन करण्यात आले. माती परीक्षणाची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, आधुनिक शेती अवजारांचे सादरीकरण तसेच पाणी व्यवस्थापनाच्या १५ मॉडेल्सद्वारे जलसंधारणाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.संवाद सत्रामध्ये नीती आयोगाचे अध्यक्ष डॉ. रमेशचंद्र, DBT आयोजक सुधीर मोहंती व GVT संस्थापक मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व मार्गदर्शन केले.उद्घाटन सत्रात अध्यक्षा रो. रोहिणी पाठक यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, तर प्रकल्प संचालक रो. डॉ. अनिल केंद्रे यांनी शेतकऱ्यांना अशा उपक्रमांत अधिक सहभाग घेण्याचे आवाहन केले. GVT तज्ज्ञांनी पारंपरिक ते आधुनिक व नैसर्गिक शेतीपर्यंत सखोल मार्गदर्शन केले.या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीबाबत ज्ञान, प्रत्यक्ष अनुभव व आत्मविश्वास वाढला असून, शाश्वत शेती व ग्रामीण आर्थिक विकासासाठी हा प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरला. Rotary in Action – शेतकरी सक्षमीकरण, शेती समृद्धी!









# मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर क्र. 9 – अहवाल

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व आनंदऋषी नेत्रालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी घेण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत दिनांक 8 फेब्रुवारी 2026 रोजी रोटरी कार्यालय, अंबाजोगाई येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.या शिबिरात एकूण 54 रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी 17 रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले असून 14 रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी अहिल्यानगर येथे पाठविण्यात येणार आहे. तसेच 12 रुग्णांना चष्मे देण्यात आले.हा उपक्रम ग्रामीण व गरजू नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून रोटरीच्या सेवाभावी कार्याची प्रभावी झलक या माध्यमातून दिसून आली.





## “क्लब फूट साहित्य वाटप”

Rotary Club of Ambajogai City | UNITE FOR GOOD

# “क्लब फूट साहित्य वाटप”








रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीतर्फे दिनांक 12 फेब्रुवारी 2026 रोजी स्वामी रामानंद तीर्थ मेडिकल कॉलेज, अंबाजोगाई येथे “क्लब फूट साहित्य वाटप” हा संवेदनशील उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.या उपक्रमाअंतर्गत 22 बालकांना कास्ट सॉफ्ट रोल, पीओपी साहित्य व विशेष शूज़-ब्रेसेस वाटप करण्यात आले. जन्मजात वाकडे पाय असलेल्या बालकांच्या उपचारासाठी हे साहित्य अत्यंत उपयुक्त ठरून त्यांच्या आयुष्यात नव्या आशेचा किरण निर्माण झाला.हा उपक्रम क्युअर इंडिया व मेडिकल कॉलेज यांच्या सहकार्याने गेल्या 3 वर्षांपासून सातत्याने राबविला जात आहे.प्रभारी अधिष्ठाता डॉ. अरविंद बगाटे व अस्थी विभाग प्रमुख डॉ. दीपक लामतुरे यांनी वैद्यकीय मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी पांचाळ (क्युअर इंडिया) यांनी केले.अध्यक्षीय समारोप रो. अक्षय (भैय्या) मुंदडा यांनी केला.अध्यक्षा रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, प्रोजेक्ट डायरेक्टर प्रदीप झरकर, कल्याण काळे, संतोष मोहिते, शकील भाई शेख, बालाजी घाडगे, अजय पाठक, राजेंद्र घोडके, स्वप्नील परदेशी, राधेश्याम लोहिया तसेच अश्विनी पांचाळ मॅडम (क्युअर इंडिया) यांची उपस्थिती होती.हा उपक्रम केवळ साहित्य वाटप नसून बालकांना नवे जीवन, आत्मविश्वास आणि चालण्याची नवी दिशा देणारा ठरला.“आज सरळ झालेले पाय... उद्या आत्मविश्वासाने जग जिंकतील.”








Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# शिवजयंती निमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व छत्रपती शंभुराजे प्रतिष्ठान, सनई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी चनई येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले.या शिबिरात २५० पेक्षा अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली. मधुमेह, हृदयरोग, दंत तपासणी, बी.पी., ब्लड शुगर व ईसीजी तपासणीसह आवश्यक औषधोपचार व मार्गदर्शन देण्यात आले. तज्ञ डॉक्टर:डॉ. अतुल शिंदे, डॉ. नवनाथ घुगे, डॉ. पल्लवी लोमटे, डॉ. सचिन पोतदार, डॉ. सुरेश आरसुडे, डॉ. इमरान अली प्रकल्प नेतृत्व:रो. बालासाहेब कदम, रो. रमेश देशमुख, रो. संतोष मोहिते उपस्थित मान्यवर:डॉ. नवनाथ घुगे, डॉ. सचिन पोतदार, डॉ. अतुल शिंदे, डॉ. सुरेश आरसुडे, कल्याण काळे, धनराज सोळंकी, सचिव मंजुषा जोशी, रो. संतोष मोहिते, झरकर अण्णा, रो. बालासाहेब कदम, अजय पाठक, रुपेश रामावत, गोपाल पारिख, राजेंद्र घोडके, स्वप्रिल परदेशी, अजित देशमुख, गणेश राऊत, बालाजी घाडगे हा उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आरोग्य सेवा, जनजागृती व समाजाशी नाते दृढ करणारा प्रेरणादायी ठरला.





# रोटरीने पोलीस ठाण्याच्या भिंती केल्या बोलक्या

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी तर्फे पोलीस स्टेशन व न्यायालय परिसरात व्यसनमुक्ती, पर्यावरण, सर्वधर्म समभाव व सामाजिक संदेश देणारी 50 भित्तिचित्रे साकारण्यात आली. या उपक्रमाचे उद्घाटन डिस्ट्रिक्ट पब्लिक इमेज डायरेक्टर रो. निलेश वाईकर व पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या हस्ते झाले.या प्रसंगी अध्यक्षा रो. रोहिणी पाठक, रो. संतोष मोहिते, रो. अविनाश मुडेगावकर, रो. कल्याण काळे, रो. धनराज सोळंकी, रो. राजेंद्र घोडके व इतर रोटरी सदस्य उपस्थित होते.











Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# मुळव्याध तपासणी व आयुर्वेदिक मार्गदर्शन शिबिर






"आरोग्य जागरूकतेकडे आयुर्वेदाचा स्पर्श!" आयुष्यमान आयुर्वेदिक क्लिनिक येथे डॉ. पल्लवी लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत मुळव्याध तपासणी व आयुर्वेदिक सल्ला शिबिर घेण्यात आले.या प्रसंगी डॉ. नवनाथ घुगे, रो. निलेश वाईकर, रणजीत लोमटे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अध्यक्षा रो. रोहिणी पाठक, रो. संतोष मोहिते, रो. धनराज सोळंकी, रो. राजेंद्र घोडके, रो. रुपेश रामावत व इतर सदस्य उपस्थित होते.

# शीत शवपेटी लोकार्पण

"दुःखातही साथ... हीच खरी मानवता!"गरजू कुटुंबांना मदत मिळावी या उद्देशाने शीत शवपेटी जनसेवा हॉस्पिटलचे संचालक डॉ. तौफिक खान पठाण यांना सुपूर्द करण्यात आली.या प्रसंगी रो. निलेश वाईकर व पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमात अध्यक्षा रो. रोहिणी पाठक, TRF डायरेक्टर डॉ. नवनाथ घुगे, रो. धनराज सोळंकी, रो. अविनाश मुडेगावकर, रो. संतोष मोहिते, रो. कल्याण काळे, रो. राजेंद्र घोडके, रो. रुपेश रामावत व इतर रोटरी सदस्य उपस्थित होते.








# 121 वा रोटरी डे सेलिब्रेशन












# उत्थान साधना : AGLS, DTLS, RLI SEMINAR, PUNE




पुणे येथे आयोजित AGLS – DTLS सेमिनारमध्ये रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ने Co-Host म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कार्यक्रमाच्या Call to Order नंतर रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने क्लब फ्लॅगचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी प्रांतपाल रो. सुधीर लातुरे, भावी प्रांतपाल रो. जयेशभाई पटेल व पारुल पटेल, DGN रो. क्षितिज जवारे, स्वाती हेरकल तसेच रोटरी क्लब ऑफ सोलापूरची मेंटर टीम उपस्थित होती.तसेच अध्यक्षा रो. रोहिणी पाठक, उपाध्यक्ष रो. धनराज सोळंकी, IPP रो. कल्याण काळे व इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.हा उपक्रम रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या सक्रिय सहभागाचे व नेतृत्वाचे उत्कृष्ट उदाहरण ठरला.






# उत्थान साधना : AGLS, DTLS, RLI SEMINAR, PUNE



























# Weekly Meeting














Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# BIRTHDAY WISHES














# News Paper



पार्श्वभूमी

## रोटरीच्या वतीने शीत शवपेटीचे लोकार्पण

## लोकांच्या दु:खात आधार देणे हीच खरी मानवता होय–निलेश वाईकर

अंबाजोगाई दि २४ (प्रतिनिधी)– लोकांच्या दु:खात आधार देणे हीच खरी मानवता आहे.असे प्रतिपादन रोटरीचे प्रांत पब्लिक इमेज डायरेक्टर निलेश वाईकर यांनी केले.

रोटरीच्या १२१ व्या वर्धापन दिनानिमित रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने उम्मीद ट्रस्ट संचलित जनसेवा हॉस्पिटल चे संचालक डॉ. तौफिक खान पठाण यांच्या कडे शीत शवपेटीचे (मोर्चुरी बॉक्स )लोकार्पण करण्यात आले.



मराठवाडा साथी

epaper.marathwadasathi.com
25 Feb 2026 - Page 3

## रोटरीच्या वतीने शीत शवपेटीचे लोकार्पण

दु:खाच्या क्षणी आधार देणे हीच खरी मानवता - निलेश वाईकर



नवराष्ट्र

Latur | 23 February 2026 | Page 2

सेवाभाव २५० ग्रामस्थांची तपासणी; रोटरी क्लब, शंभूराजे प्रतिष्ठानचा उपक्रम

## चनई येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

नि:स्वार्थ सेवाभावातून डॉक्टरांनी केले उपचार



दिव्य मराठी बीड जिल्हा 03-02-2026

बीड जिल्हा

उपक्रम • अंबाजोगाई येथील रोटरी क्लब, आयएमएच्या पदाधिकाऱ्यांचा पुढाकार

## अंबाजोगाईत १५३ बालकांची हृदयरोग व २-डी इको तपासणी

तपासण्या व उपचार

पंधरा वर्षांत केल्या ८ हजार ५०० बालहृदयरोग शस्त्रक्रिया



दैनिक न्याय टाईम्स संपादक : बालकिशन सोनी

## रोटरीच्या वतीने शीत शवपेटीचे लोकार्पण

दु:खाच्या क्षणी आधार देणे हीच खरी मानवता-निलेश वाईकर

25 Feb 2026 - Page 4 | epaper.nyaytimes.in
Powered by softsky | 9764331134



दिव्य लोकप्रभा
Tue 03-02-2026
Page No. 4

## अंबाजोगाईच्या २० चिमुकल्यांवर पुण्यात होणार मोफत हृदय शस्त्रक्रिया



## चनई येथे रोटरीचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर



## अंबाजोगाईत १५३ बालकांची मोफत हृदय तपासणी : २० चिमुकल्यांवर पुण्यात मोफत हृदय शस्त्रक्रिया होणार

अंबाजोगाई मिरर



विवेक सिंधु

## रोटरीच्या वतीने शीत शवपेटीचे लोकार्पण

दु:खाच्या क्षणी आधार देणे हीच खरी मानवता - निलेश वाईकर

25 Feb 2026 - Page 4 | epaper.viveksindhu.com
Powered by | softsky.com 9764331134



## अंबाजोगाईत रोटरी क्लबच्या वतीने 'क्लबफूट' बाधितांना साहित्याचे वाटप

युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या उपस्थितीत गरजू बालकांना मिळाला मायेचा आधार



दिव्य लोकप्रभा
Sun 22-02-2026
Page No. 4

## चनई येथे रोटरीचे आरोग्य तपासणी शिबिर

Rotary Club of Ambajogai City | UNITE FOR GOOD

# फ्लायर्स




# ...अभिनंदन...

